प्रकरण पहिले

: सहकारी पतपुरवठा-उगम, रचना आणि धोरण :

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

प्रकरण पहिले

: सहकारी पतपुरवठा-उगम, रचना आणि धोरण :

विभाग पहिला

: सहकारी कर्जपुरवठयाचा प्रारंभ(उगम) :

सहकारी चळवळीची सुरूवात इंग्लंडमध्ये १८४४ ला रॉश्डेलच्या विणकरानी ग्राहक भांडार स्थापन केले तेंव्हापासून झाली. हा सहकार ग्राहक भांडारापुरताच मर्यादीत होता. परंतु सहकारी पतपुरवठयाचा प्रारंभ जर्मनीमध्ये झाला. १९ व्या शतकाच्या मध्यास जर्मनीमधील शेतकरी आणि कारागीर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती. दुष्काळ, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि व्यापारी तथा सावकारांकडून होणारी पिळवणूक यामुळे ते गांजले होते. जर्मनीतील बहुतेक व्यापार ज्यू लोकांच्या मालकीचा होता व ते सावकारी व्यवसायही करीत होते. अशा परिस्थितीत हर फ्रान्स शुल्झो व हर रफायझान यांनी अनुक्रमे नागरी व ग्रामीण क्षेत्रासाठी योग्य सहकारी संघटन सुचविले व राबविले. स्वालंबन व परस्पर सहकार्य यामधूनच दुर्बल लोकांचा प्रश्न सुटेल असे त्यांना दिसून आले. दोघेही दूरदृष्टीचे आणि निष्ठावंत असे समाजसेवक होते[१].

हर फ्रान्स शुल्झो:

१८५० मध्ये शुल्झो यानी त्यांचे गावात सहकारी तत्वावरील पहिली संस्था स्थापन केली. पुढे १८५६ मध्ये त्यानी एका पुस्तकाव्दारा आपल्या या कल्पनेचा सर्वत्र प्रचार केला. यामधूनच जर्मनीत सर्वत्र नागरी सहकारी बँका स्थापन झाल्या. पुढे त्यांची संघसंस्थाही स्थापन करण्यात आली. या बँकाच्या संघसंस्थेच्या प्रयत्नाने १८६७ ला जर्मनीत पहिला सहकारी कायदाही तयार करण्यात आला.

हर रफायझान:

रफायझान हे एका नगरपालिकेचे महापौर होते. त्यांनी दुष्काळपीडीत शेतक-यांना मदत पुरविण्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. तसेच निधी निर्माण करून शेतक-यांना शेतीसाठी भांडवल पुरविले. शेतक-यांनी या भांडवलाची परतफेड प्रामाणिकपणाने केल्याचे त्यांनी पाहिले. त्यामुळे अशा शेतक-यांना सभासद करून घेतले व त्यामधून त्यांची पत संघटना स्थापन केली. नैतिक अधिष्ठान आणि सामूहिक तारणाचे आधारे एक निधी उभा केला. या संस्थामध्ये अमर्यादित देयता तत्वाचा स्वीकार करण्यात आलेला होता. पुढे १८७७ मध्ये अशा संस्थाची रफायझान युनियन ही संघसंस्था स्थापन करण्यात आली. रफायझानचे नावानेच ग्रामीण भागातील पतसहकारी संस्था ओळखल्या जातात. या संस्थात धर्ममूल्ये व नैतिकता यावर भर दिलेला होता. स्वावलंबन, परस्पर सहकार्य, समता, संयुक्त देयता, नफ्याकडे दुर्लक्ष-विरोध इ.तत्वे या संस्थामध्ये दिसून येतात.

जर्मनीमधील या प्रकारच्या सहकारी संस्थाची आदर्श कार्यपध्दती व तत्वे समोर ठेऊन जगामधील अनेक देशामध्ये पतपुरवठयासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. अशात-हेने पतपुरवठयाच्या कार्यासाठी सहकाराचा वापर जर्मनीमध्ये प्रथमच करण्यात आला. यामधूनच सर्व देशात सहकारी तत्वावरील पतपुरवठयाची सुरूवात झाली.

भारतामध्ये सहकारी पतपुरवठयाची सुरूवात:

इंग्लंड-जर्मनी किंवा जगातील इतर देशामध्ये ज्या परिस्थितीतून व ज्या कारणासाठी सहकारी चळवळीची सुरूवात झाली तशीच भारतामध्येही समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या लोकांचेकडून, त्यांची आर्थिक पिळवणूक थांबणेसाठी सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. १९ व्या शतकाच्या

उत्तरार्धात भारतात ग्रामीण जनतेची, शेतक-यांची परिस्थिती हलाखीची बनलेली होती. कुटीरोद्योग नष्ट होत होते. निकृष्ट शेती आणि सावकारांची पिळवणूक यामुळे शेतकरी सतत कर्जबाजारी राहत होता. स्वत:वीच जमीन सावकाराकडे गहाण पडून शेतकरी मजूर म्हणून शेतावर राबत होता. शेतमजूर व शेतकरी असंधटीत आणि अज्ञानी होते. त्यामुळे निकृष्ट जीवन जगण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय नव्हता. शेतीचा विकास होण्याऐवजी अधोगतीची सुरूवात झालेली होती.

" कर्जात जन्म, कर्जात जीवन व कर्जातच मृत्यू " असे भारतीय शेतक-यांचे यथार्थ वर्णन वरील परिस्थितीमुळे केले जात होते. शेतक-यांचे दारिद्र्य वाढत होते. ब्रिटीश राजवटीमुळे या परिस्थितीकडे जास्तच दुर्लक्ष होऊन या प्रक्रियेला वेग आलेला होता. यामुळे शेतकरीवर्गाचे व पर्यायाने देशाचेही मोठे नुकसान होत होते. या परिस्थितीशी मुकाबला करून शेतक-यांची सुटका करणेसाठी कांही तरी मार्ग शोधणे अत्यंत गरजेचे होते. दक्षिण भारतात असंतुष्ट, कर्जबाजारी अशा कांही शेतक-यांनी संधटीत होऊन " रोखे फाडीची मोहीम " हाती घेतली. शेतकरी असा स्वत:च संधटीत होऊ लागला व प्रयत्न करू लागल्याने सरकारला त्याना सहानुभूती दाखविणे भाग पडले. त्यामुळे सरकारने शेतीसंबंधी कांही कायदे केले. १९०१ च्या फॅमिन कमिशनने वरवरचे उपाय न करता यासाठी कायमची व योग्य उपाययोजना करण्याचे सरकारला सुचविले. यावेळीच कांहीनी जर्मनीमधील सहकारी पतसंस्थाप्रमाणे भारतामध्येही शेतक-यांना संधटित करून सहकारी संस्था स्थापन करून शेती पतपुरवठयाचा प्रश्न सोडविण्याची कल्पना सरकारला सुचविली[२].

यासंदर्भात प्रत्याक्षात निश्चितपणे प्रयत्न केले ते तत्कालीन मद्रास सरकारने. त्यानी १८८२ मध्ये सर फ्रेडरिक निकोलसन याना शेतीसाठी बँका स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार व सूचना करण्याचे आदेश दिले. त्यानी

' रफायझान पध्दतीच्या ' ग्रामीण सहकारी पतपेढया स्थापन करणेची शिफारस सरकारला केली. याच दरम्यान डयुपरनेक्स यानी उत्तर प्रदेशात ग्रामीण बँकांचा प्रयोग सुरू केला होता[3]. अशा प्रयत्नामुळे सरकारचे लक्ष वेधले गेले व सरकारने सर एडवर्ड लॉ यांचे अध्यक्षातेखाली समिती नेमली. या समितीने नागरीव ग्रामीण भागामध्ये पतपुरवठयासाठी सहकारी तत्वावर संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. तसेच नमुना योजना, योग्य कायदा, देखरेख यंत्रणा निर्माण करण्याच्याही सूचना केल्या. या शिफारसीनुसार १९०४ ला पहिला भारतीय सहकारी कायदा अंमलात आणला गेला[3]. या कायद्याचा प्रमुख हेतू म्हणजे बचत, स्वावलंबन आणि परस्पर सहकार्याने शेतकरी, कारागीर वर्ग व मर्यादीत साधने असणा-या लोकांचे आर्थिक कल्याण घडवून आणणे हा होता.

१९०४ च्या भारतीय सहकारी कायद्याचे वैशिष्ठय म्हणजे या कायद्यानुसार फक्त पतपुरवठा करण्यासाठीच सहकारी संस्था स्थापन करणेची परवानगी देण्यात आलेली होती. या कायद्याची कांही महत्वाची वैशिष्टये पुढीलप्रकारची होती[4].

१) एका खेडयातील किंवा शहरातील कोणत्याही दहा व्यक्तीनी एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करता येईल.

२) सहकारी संस्थाचे वर्गीकरण ग्रामीण व नागरी असे करून ग्रामीण भागातील संस्थासाठी अमर्यादीत देयता तत्व व नागरी भागातील संस्थासाठी मर्यादीत किंवा अमर्यादीत तत्व असा पर्याय ठेवला होता.

३) फक्त पतपुरवठयासाठीच सहकारी संस्था स्थापन करता येईल.

४) सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले होते.

५) पतसंस्थाना सभासदाना वैयक्तीक किंवा तारण घेऊन कर्जपुरवठा करण्याची मुभा दिली होती.

६) पतसंस्थेतील सभासदाचा भाग भांडवलातील भाग जास्तीत जास्त एक हजार रूपया पर्यंतच असावा.

७) पतसंस्थाची हिशेब तपासणी सहकारी खात्याकडून विनामूल्य करण्याची तरतूद होती.

८) उत्पन्न कर, स्टॅम्प ड्युटी व नोंदणी फी सहकारी संस्थाना माफ करण्यात आली होती.

९) प्रत्येक राज्यात रजिस्ट्रारची नेमणूक करणेची तरतूद होती.

१०) प्रत्येक सहकारी संस्थेला कायद्याने कायदेशीर व्यक्तीचा दर्जा देण्यात आला होता.

या कायद्यामुळे भारतामध्ये सहकारी चळवळीची सुरूवात झाली आणि सहकारी पतपुरवठा संस्थांचा विस्तार मोठया प्रमाणात झाला. पुढे १९१२ ला सुधारीत सहकारी कायद्यानुसार संघ संस्था स्थापन करणेची परवानगी देण्यात आली. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकांची स्थापना करण्यात आली. १९१९ च्या सुधारणा कायद्यानंतर सहकार खाते हे राज्य सरकारकडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे राज्यानी सहकारी चळवळीची योग्य रचना केली. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँका तसेच दीर्घमुदती कर्जपुरवठा करण्यासाठी भूविकास सहकारी बँकांचीही स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सहकारी पतपुरवठयाची समन्वित आणि सुसंबध्द अशी रचना करण्यात आली आहे.

: उद्दीष्टये :

सहकारी पतपुरवठयाची आवश्यकता:

सहकारी संस्थाचेकडून दिला जाणारा पतपुरवठा हा सर्वसाधारणपणे असंघटीत व्यवसायासाठी दिला जात असे. उदा.असंघटीत असा शेती व्यवसाय,

लघुउद्योगधंदे, ग्राहक व्यवसाय, शेतमालाची विक्री करणाऱ्या सहकारी संस्था प्रक्रीया आणि घरबांधणी यासाठी सहकारी पतपुरवठा केला जातो. यामुळे व्यापारी बँका किंवा मोठेमोठे उद्योगधंदे यांचे संदर्भात तुलनात्मक विचार केला असता सहकारी पतरचनेतील सहकारी बँका, पतसंस्था यांचे कार्य एकसारखे दिसले तरी उद्दीष्टये, धोरणे, कार्यपध्दती, कार्यक्षेत्राची मर्यादा, नोकरवर्ग आणि उत्पन्न व खर्चाचे प्रमाण या प्रमुख बाबीमध्ये फरक दिसून येतो. सहकारी संस्थेत नफ्यापेक्षा सेवाभाव हा दृष्टीकोन महत्वाचा मानला जातो. व्यापारी बँकापेक्षा सहकारी संस्थेमध्ये उदारतेचे धोरण असते कारण सहकारी पतपुरवठा हा समाजातील दुर्बल वर्गासाठी असतो. सहकारी संस्थामध्ये व्यापारी बँकासारखी तारणाबाबतची भूमिकाही ताठर नसते.

सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये खर्चाचे प्रमाण कमीतकमी ठेवले जाणे आवश्यक असते. त्यामुळे कमीतकमी व्याजदरात सभासदांना कर्जपुरवठा करता येतो. तारणाबाबतही भूमिका उदार ठेवणे महत्वाचे असते. परिणामी दुर्बल सभासदांना पतपुरवठा करणे शक्य होते. ठेवी जमा करून बचतीच्या संचयी निर्माण करणे व या ठेवीमधून संस्थेचे भांडवल वाढविणे, दिलेल्या पतपुरवठयाचा योग्य वापर व्हावा यासाठी त्या कर्जाच्या विनियोगावर देखरेख करणे, तसेच, आवश्यक ते मार्गदर्शन करणे इ. उद्देश सहकारी पतपुरवठयामागे आहेत.

प्रा. होरेस बेलशा या तज्ञांच्या मतानुसार सहकारी पतपुरवठयाची प्रमुख उद्दीष्टये पुढीलप्रकारची आहेत[५].

१) सहकारी संस्थेतील निधीची उभारणी करणेसाठी बचतीचे संवर्धन करणे.

२) दिलेल्या पतपुरवठयाचा चांगला वापर होण्यासाठी देखरेख व मार्गदर्शन करणे, त्यामुळे पतपुरवठयाच्या गैरवापराची शक्यता टाळणे.

३) तारणांबाबत उदार दृष्टीकोन ठेवूनही कर्जबुडीताची शक्यता कमी करणे.

४) सहकारी संस्थेचा व्यवस्थापकीय खर्च किमान ठेऊन घावयाच्या व्याजदर कमी ठेवण्याचा प्रयत्न करणे.

५) वरील सर्वांचा परिणाम म्हणून सहकारी पतसंस्थेची पत वाढविणे व इतर मार्गानी सहज भांडवल उभारण्याची शक्यता वाढविणे.

सहकारी पतपुरवठा हा ग्रामीण भागामध्ये बहुतांशी शेतीसाठीच दिला जाते. शेतीमधून निघणारे उत्पादन कमी, उत्पादनाचा खर्च मात्र जास्त उत्पन्न कमी म्हणून शेतकरी कर्जबाजारी असतो. सावकार आणि व्यापारी यांचेकडून अशा गरीब शेतकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक होते. शेतक-यांचे आर्थिक शोषण कमी करून सहकारी संस्थेच्या मदतीने, एकमेकांच्या सहकार्याने त्याचा विकास करणे हेच सहकारी पतपुरवठयाचे महत्वाचे उदिष्ट राहते.

सहकारी पतपुरवठयाचे वर्गीकरण:

सहकारी संस्थांचे माध्यमातून देण्यात येणा-या कर्जपुरवठयाचे वर्गीकरण हे देण्यात येणा-या कर्जाचा उद्देश किंवा हेतू आणि कर्जफेडीची कालमर्यादा ध्यानात घेऊन केले जाते. सर्वसाधारणपणे सहकारी पतपुरवठयाचे पुढील तीन प्रकार पडतात[६].

१) अल्पमुदतीचा कर्जपुरवठा.

२) मध्यममुदतीचा कर्जपुरवठा.

३) दीर्घमुदती कर्जपुरवठा.

अल्पमुदती कर्जपुरवठयाची कर्जफेडीची मुदत सुमारे १ ते १$\frac{१}{२}$ वर्षे इतकी असते. अशा कर्जाचा उद्देश प्रामुख्याने शेतीमधील पीक चांगल्याप्रकारे घेता यावे व त्यापासून चांगले उत्पन्न मिळावे हा असतो. भारतामध्ये या प्रकारच्या पतपुरवठयास शेतीव्यवसायात 'पीककर्ज' म्हणूनच ओळखले जाते.

प्रारंभी बहुतांशी अल्पमुदती म्हणजे " पीककर्ज " हे जमीनीच्या तारणावर दिले जात असे. १९६० मध्ये मेहता कमिटीने " पीक कर्ज " हे वैयक्तीक तारणावर आणि ज्या पिकासाठी कर्ज द्यावयाचे आहे त्या संभाव्य पीकावर करारानुसार प्रभार निर्माण करून द्यावे अशी शिफारस केली. त्यामुळे जमिनीवर कष्ट करणाऱ्या कुळांनाही असे कर्ज मिळू लागले. पूर्वी फक्त जमिन मालकालाच मिळत होते.

मध्यममुदतीचे कर्ज हे तीन ते पाच वर्षांच्या मुदतीसाठी असते. नवीन जमिनी लागवडीखाली आणणे, जमिनीचे सपाटीकरण करणे, बांध-बंदिस्ती करणे, मोटारपंप, इंजिन खरेदी, पाईपलाईन, शेती उपयुक्त जनावरे (बैल, म्हैशी) खरेदी करणे, शेतीसाठी अवजारे, साखर कारखान्याचा शेअर खरेदी इत्यादि हेतूसाठी हा कर्जपुरवठा केला जातो. अल्पमुदती कर्जाच्या तुलनेत ही मोठी रक्कम असते व त्यामुळे कर्ज फेडीसाठीही जास्त मुदत आवश्यक असते.

दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा हा सुमारे १० ते २० वर्षे इतक्या मुदतीसाठी दिला जातो. वरील दोन्ही कर्ज प्रकारांच्या तुलनेने कर्जाची रक्कमही बरीच मोठी असते. शेती उपयुक्त यंत्रसामग्री खरेदी करणे, पाणी पुरवठयाच्या मोठया योजना, जमीन सुधारणा करणे, जमिन खरेदी करणे, नवीन विहीर काढणे इत्यादि हेतूनी असा कर्जपुरवठा केला जातो. पूर्वी जुनी कर्जे फेडण्यासाठीही दीर्घमुदती कर्ज दिले जात असे. आता त्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे. अलीकडे शेतीस उपयुक्त असे जोड उद्योग सुरू करण्यासाठी ही दीर्घमुदती कर्ज दिले जाते. उदा.कुक्कुटपालन, संकरीत गाई-म्हैशी खरेदी करून दुग्ध व्यवसाय करणे इत्यादि.

विभाग दुसरा

: सहकारी कर्जपुरवठयाची रचना :

भारतामध्ये सहकारी कर्जपुरवठयाची रचना ही व्दिस्तरीय किंवा त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. तसेच ही संधीय स्वरूपाची आहे. या रचनेमधून फक्त शेतकरी किंवा ग्रामीण पतसंस्था पातळीवरच नव्हे तर विविध पातळीवर (जिल्हा व राज्य) कर्जपुरवठा करणा-या अनेक संस्था-बँकात समन्वय रहावा अशा प्रकारची अपेक्षा आहे. निश्चित प्रकारचे आधुनिक धोरण एकसुत्रीपणे सगळीकडे अंमलात आणण्याच्यादृष्टीनेही पतपुरवठा संस्थातील समन्वयाची गरज आहे. एकूण पतपुरवठाही त्यामुळे सुरक्षित राहू शकतो. त्यासाठी ही रचना योग्य आहे.

पतपुरवठा करणा-या सहकारी संस्थामध्ये कार्याच्या व व्यवस्थापनाच्या सोयीनुसार दोन गट किंवा भाग पाडलेले आहेत:-

१) अल्प व मध्यम मुदती कर्जपुरवठा करणा-या सहकारी संस्था व बँका.

२) दीर्घमुदती कर्जपुरवठा करणा-या सहकारी बँका.

भारतातील सहकारी कर्जपुरवठयाची रचना पुढील आलेखावरून समजून येते.

सहकारी पतपुरवठा रचना

अल्प व मध्यममुदत पतपुरवठा संस्था (त्रिस्तरीय) — दीर्घ मुदती पतपुरवठा संस्था (व्दिस्तरीय)

राज्य सहकारी बँका — राज्य भूविकास सहकारी बँका

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका — जिल्हा-तालुका प्राथमिक सह.भूविकास बँका

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था

शेतकरी

भारतामध्ये सहकारी पतपुरवठयामध्ये सहभागी असणा-या सर्व सहकारी पतसंस्था व बँका यांचे विविध पातळीवरील संख्यात्मक स्वरूप पाहता ही सहकारी पतपुरवठयाची रचना त्रिशंकूसारखी दिसून येते[७]. कारण प्राथमिक किंवा ग्रामीण स्तरावर पतपुरवठयाचे कार्य करणा-या सहकारी पतसंस्थांची संख्या खूप मोठी आहे. त्यानंतर जिल्हा पातळीवर कार्य करणा-या सहकारी बँका व शेवटी राज्य पातळीवरील सर्वोच्च संघसंस्था (बँक) अशा त-हेने पुढीलप्रमाणे ही रचना आहे.



<u>अल्पमुदती कर्जपुरवठा रचना:</u>

गावपातळीवर प्राथमिक सहकारी पतसंस्थांची संख्या जास्त आहे. या संस्थांची मध्यवर्ती संघसंस्था जिल्हा पातळीवर स्थापन केलेली असते. ती म्हणजे प्रत्येक जिल्हयासाठी असणारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. यांची संघसंस्था राज्य पातळीवर स्थापन केलेली असते. त्यास शिखर बँक - सर्वोच्च संघसंस्था

म्हणतात. ती प्रत्येक राज्याची राज्य सहकारी बँक होय. प्रत्येक राज्यामध्ये अल्प व मध्यमुदती पतपुरवठा करणाऱ्या रचनेमध्ये ती सर्वोच्च ठिकाणी आहे.

दीर्घमुदती कर्जपुरवठा रचना:

दीर्घमुदती कर्जपुरवठयाचे बाबतीत कांही राज्यात व्दिस्तरीय तर कांही राज्यामध्ये त्रिस्तरीय अशा स्वरूपाची रचना आहे. व्दिस्तरीय रचनेत राज्य पातळीवर कार्य करणारी राज्य सहकारी भूविकास बँक असते. या बँकेच्या जिल्हा व तालुका पातळीवर शाखा असतात. अशा शाखामार्फत दीर्घमुदती कर्जपुरवठा दिला जातो.

त्रिस्तरीय रचनेमध्ये जिल्हा सहकारी भूविकास बँका स्वतंत्र आहेत व त्यांची संघसंस्था राज्य पातळीवर आहे, ती म्हणजे राज्य सहकारी भूविकास बँक होय. दीर्घमुदती कर्जपुरवठयाबाबत राज्य सहकारी भूविकास बँक ही सर्वोच्च आहे.

अशाप्रकारे भारतातील सहकारी कर्जपुरवठयाची ही रचना अत्यंत योग्य समन्वित व महत्वाची अशी आहे.

डॉ.धनंजयराव गाडगीळ यांचे नेतृत्वाखाली नेमलेल्या नॅशनल क्रेडिट कौन्सिलच्या अहवालात म्हटले आहे की, ' सहकारी बँक पध्दती ही समन्वित असून ती आपल्या त्रिस्तरीय रचनेव्दारा शेतकरी, कारागीर व सामान्य लोकांना पतपुरवठा करीत आहे. या त्रिस्तरीय रचनेमुळे या सहकारी संस्थाना शहरी विभागातील साधनसंपत्तीचा ओघ ग्रामीण विभागाकडे वळविणे शक्य झाले आहे व हे कार्य या रचनेव्दारा अल्पखर्चात पार पाडले जाते'.

सहकारी पतपुरवठा रचनेमध्ये विविध पातळीवर कार्य करणाऱ्या सहकारी संस्था किंवा बँका:-

प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था:

प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था म्हणजे " भारतातील सहकारी चळवळीचा गावपातळीवरील महत्वाचा व पायाभूत आधार आहे ". प्रत्यक्ष शेतक-यांचा या संस्थाशी संबंध येतो. शेतक-यानीच एकत्रित येऊन त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी या संस्था स्थापन केलेल्या असतात. भारतातील एकूण सहकारी संस्थामध्ये प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांचा वाटा ६० ते ६५ टक्के इतका आहे. त्यामुळे भारतीय सहकारी चळवळीचे यशापयश या संस्थांच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून असते.

प्राथमिक सहकारी पतसंस्था आपले भांडवल समासदांमध्ये भाग विक्री करून मिळवते. तसेच समासद आपल्या बचती या संस्थाकडे ठेवतात. समासदांची कर्जाची गरज या संस्था भागवितात परंतु त्यांचेकडे कमी भांडवल असते म्हणून या संस्था जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतात व त्यामधून समासदांना कर्जपुरवठा करतात. या कारणासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेस सर्व प्राथमिक सहकारी पतसंस्था जोडलेल्या असतात.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका:

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे त्रिस्तरीय पतपुरवठा रचनेनुसार समतोल साधणारा मध्यवर्ती घटक होय. या बँका आपल्या जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतसंस्थाना कर्जपुरवठा करीत असतात. मध्यवर्ती बँका ही प्राथमिक सहकारी संस्थांची संघसंस्था होय. जिल्ह्यातील सहकारी संस्था तसेच व्यक्तीसुध्दा या संघसंस्थेच्या समासद असतात.

मध्यवर्ती सहकारी बँकेची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे:

१) प्राथमिक सहकारी पतसंस्थाना त्यांचे गरजेनुसार कर्जपुरवठा करणे.

२) ग्रामीण भागात व्यापारी बँकेप्रमाणे बँकींगची सर्व कार्ये करणे.

३) प्राथमिक सहकारी पतसंस्थांची कार्यक्षमता व अर्थक्षमता वाढविण्याच्यादृष्टीने त्यांच्यावरती देखरेख ठेवणे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकेच्या सभासद असतात. आवश्यकतेप्रमाणे मध्यवर्ती बँक राज्य सहकारी बँकेकडून कर्ज मिळवते व त्याचा वापर प्राथमिक संस्थाना द्यावयाच्या कर्जासाठी केला जातो. सरकारी व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पतपुरवठा धोरणानुसार शेतीकरता मिळणाराकर्जपरवठा राज्य सहकारी बँकेकडून या बँका स्वीकारतात. जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या विकासाची जबाबदारी जिल्हा मध्यवर्ती बँकेवरच असते.

राज्य सहकारी बँका (शिखर बँक):

सहकारी पतपुरवठा यंत्रणेमध्ये राज्य सहकारी बँक ही सर्वोच्च ठिकाणी असते. त्यामुळे या बँकेस शिखर बँक असे म्हणतात. सहकारी पतपुरवठयामध्ये ही बँक समतोल निर्माण करते. ग्रामीण भागातील भांडवलाची मागणी व पुरवठा यामध्ये संतुलन साध्य करण्याचे महत्वाचे कार्य या बँका करतात. सहकारी संस्थाना आवश्यक असणारे भांडवल कमी व्याजदराने मिळवून त्याच्या वाटपाचे कार्य या बँका करतात व राज्यातील सहकारी चळवळ आर्थिकदृष्टया सुदृढ बनवितात.

राज्य सहकारी बँकेच्या सभासद त्या राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँका असतात. तसेच इतर प्रकारच्या सहकारी संस्थाही सभासद असतात. त्यांचे भाग भांडवल व जमविलेल्या ठेवी यामधून राज्य सहकारी बँकेची भांडवल उभारणी होते. अल्पमुदतीची पीक कर्जे, शेतमालाची विक्री, प्रक्रिया,शेतीसुधारणा,

दुग्धव्यवसाय इत्यादिसाठी जिल्हा मध्यवर्ती बँकाना कर्जपुरवठा करता यावा यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकाना राज्य सहकारी बँका कर्जपुरवठा करतात. म्हणजे शेतकऱ्यांना अप्रत्यक्षपणे जिल्हा मध्यवर्ती बँकामार्फत कर्जपुरवठा केला जातो. राज्यामधील सहकारी चळवळीस सर्वांगीण मदत करणे, नेतृत्व करणे, विकास घडविणे अशी कार्ये या बँकेस करावी लागतात.

सहकारी भूविकास बँका:

सहकारी पतपुरवठा रचनेमध्ये शेतीला दीर्घमुदतीची कर्जे पुरविणारी भूविकास बँक ही स्वतंत्र संस्था आहे. शेतीमध्ये भांडवली स्वरूपाची गुंतवणूक करण्यासाठी (जमीन सुधारणा, जलसिंचन योजना, विहीर खोदणे इ.) दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा आवश्यक असतो.भारतात १९२० पासून अशाप्रकारच्या बँका स्थापन झाल्या आहेत. पूर्वी या बँकाना भूतारण बँका असे संबोधले जात होते कारण या बँका जमिनीच्या तारणावर कर्जपुरवठा करतात. परंतु नियोजन काळात त्यांचे स्वरूप " भूतारण " ऐवजी " भूविकास " असे बनले. १९६९ पासून कर्जपुरवठयाच्या कसोटीबाबत "जमीन " ह्यापेक्षा शेतकऱ्याला मिळणारे " उत्पन्न " यावर अधिक भर देण्यात आला आहे[१०].

भूविकास बँकेच्या रचनेत प्रत्येक राज्यात भिन्नता आहे. अनेक राज्यात भूविकास बँका संघ स्वरूपाच्या आहेत तर कांही राज्यात एकात्म स्वरूपाच्या आहेत. भूविकास बँकाच्या भांडवल उभारणीत खाजगी संस्था, शासन व बिगर कर्जदार सभासद यांचा वाटा असतो. कांही राज्यात ऋणपत्रे विकूनही भांडवल उभारणी केली जाते.अशा ऋणपत्रांना शासनाची हमी असते. भूविकास बँकाना रिझर्व्ह बँक, आयुर्विमा महामंडळ आणि राष्ट्रीयकृत व्यापारी बँका यांचेही अर्थसहाय्य मिळते.

भूविकास बँकाच्या सुरूवातीचे काळात त्यांचे कर्जविषय धोरण अनुत्पादक असे होते. शेतक-यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी कर्जे दिली जात होती. दुस-या योजनाकाळापासून उत्पादक कारणासाठी कर्जे मोठया प्रमाणात दिली जाऊ लागली. शेती सुधारणा, पाणी पुरवठयाच्या योजना, फळबागा, शेतीउपयुक्त यंत्रसामग्री खरेदी करणे इत्यादिसाठी दीर्घ मुदतीची कर्जे दिली जातात. सामान्यत: १० ते २० वर्षे मुदतीसाठी असे कर्ज दिले जाते. शेतजमीनीच्या गहाणखतावर दीर्घमुदतीचे विकास कर्ज या बँका देतात. राज्य सहकारी भूविकास बँका जिल्हा व तालुका पातळीवरील भूविकास बँकाना अशी कर्जे शेतक-यांना देण्यासाठी अर्थपुरवठा करीत असतात. सर्वसाधारणपणे भूविकास बँकामध्ये भांडवल उभारणीचे कार्य राज्य सहकारी भूविकास बँकाच करतात व कर्जवाटपाचे कार्य जिल्हा - तालुका पातळीवरील भूविकास बँका करतात असे दिसून येते.

विभाग तिसरा

: सहकारी पतपुरवठयाचे धोरण व त्याचे बदलते स्वरूप :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची सहकारी पतपुरवठयामधील भूमिका:

सहकारी कर्जपुरवठयामधील रिझर्व्ह बँकेची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण अशी आहे. शेती क्षेत्राला लागणा-या पतपुरवठयाचा ओघ सतत योग्यप्रकारे रहावा, आवश्यक त्या सवलती मिळाव्यात आणि सहकाराची गुणवत्ता व कामकाजात सुधारणा व्हावी यादृष्टीने रिझर्व्ह बँकेने अनेक महत्वाचे उपाय योजले आहेत. त्यातूनच बहुसंस्था दृष्टीकोन, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि ' नाबार्ड ' यांची स्थापना झाली. रिझर्व्ह बँक सहकारी चळवळीस खालील मार्गांनी वित्तीय सुविधाही पुरविते[११].

अ) <u>अल्पमुदत पतपुरवठयाची तरतूद:</u>

रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकाना सवलतीच्या रूपाने पात्र हुंडयांच्या तारणावर रिझर्व्ह बँका कायद्याच्या सेक्शन १७ (२) अ, ब आणि (ब, ब) आणि १७ (४) खाली कर्जाच्या सुविधा पुरविते. तसेच सरकारी हमीचे आधारे सुध्दा सेक्शन १७ (४) खाली अॅडव्हान्स पुरविते.

सेक्शन १७ (२) (अ) नुसार ९० दिवसामध्ये मॅच्युअर होणा-या व्यापारी व्यवहारातील प्रॉमिसरी नोटस् आणि हुंडया यावरही सवलतीच्या दराने कर्जपुरवठा रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकाना करते.

सेक्शन १७ (२) (ब) नुसार १५ महिने पर्यंत मॅच्युअर होणा-या हुंडया व प्रॉमिसरी नोटस् यांचे आधारे शेतीची हंगामी कामे किंवा शेतमालाची खरेदी विक्री यासाठी सवलतीचे दराने कर्जपुरवठा केला जातो.

ब) <u>मध्यममुदत पतपुरवठयासाठी तरतूद:</u>

भारतीय रिझर्व्ह बँक कायद्याच्या सेक्शन ४६-अ २ (ब) आणि १७ (४-अ) खाली रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकाना मध्यममुदत कर्जपुरवठा करते. १५ महिने ते ५ वर्षा मुदतीसाठी मध्यममुदत कर्ज पुरविले जाते.

क) <u>दीर्घमुदत कर्जाबाबत तरतूद:</u>

भारतीय रिझर्व्ह बँक कायद्यातील सेक्शन १७ (४-अ) आणि ४६-अ २(अ)- ४६-अ (क) आणि ४६-अ २(ड) खाली रिझर्व्ह बँक दीर्घ मुदती कर्जासाठी पतपुरवठा करते.

दीर्घमुदत कर्जाच्या मांडवल उभारणीसाठी राज्य सहकारी भूविकास बँकानी विक्रीस काढलेले कर्ज रोखेही रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया खरेदी करते. असे कर्ज राष्ट्रीय शेती पतपुरवठा (दीर्घ मुदती व्यवहार) निधीमधून पुरविले जाते. (आता " नाबार्ड "कडून).

अशाप्रकारे रिझर्व्ह बँक सहकारी पतपुरवठयास आर्थिक मदत करते. १९५१ ते १९५३ चे दरम्यान रिझर्व्ह बँकेच्या कायद्यात बदल करून राज्य सहकारी बँकाना अनुसूचित (शेडयूल्ड) बँकांचा दर्जा प्राप्त करून देण्यात आला. त्यामुळे योग्य व्यापारी व्यवहारासाठी हुंडी व्यवहार करणे राज्य सहकारी बँकाना शक्य झाले आहे[१२]. बँकाना स्वतःच्या निधी इतक्या मर्यादेपर्यंत कर्ज देता येते परंतु अशी कर्जे पाच कोटी रूपयांच्या कमाल मर्यादेत असावीत असे बंधनही १९५५ मधील रिझर्व्ह बँक कायद्यातील दुरूस्तीने दूर करण्यात आले. अशात-हेने सहकारी पतपुरवठयाबाबतची रिझर्व्ह बँकेची भूमिका अधिक उदार अशी आहे.

आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती १९५१:

भारतामध्ये शेतीला पुरविल्या जाणा-या एकूण कर्जपुरवठयापैकी फार मोठा भाग सावकारांचेकडून पुरविला जातो असे अभ्यास समित्यांनी निदर्शनास आणले होते. सहकारी संस्था आणि इतर मार्ग यांचेकडून शेतीसाठी कर्जपुरवठा अल्प प्रमाणात होत होता. ग्रामीण कर्जपुरवठयामधील दोष शोधून त्यावर उपाय सुचविणेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९५१ ला श्री.ए.डी.गोरवाला यांचे अध्यक्षतेखाली " आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची " नियुक्ती केली. या समितीने आपला विस्तृत अहवाल १९५४ मध्ये रिझर्व्ह बँकेला सादर केला. या अहवालातील शिफारसींचा पुढील काळामधील सहकारी पतपुरवठयाचे धोरण ठरविण्यास फार मोठा उपयोग झाला.

समितिच्या पाहणीनुसार सहकारी पतपुरवठयाचे शेतीतील प्रमाण फक्त ३.१ टक्के इतकेच होते. होणाऱ्या पतपुरवठयामध्ये फार मोठा भाग मोठया शेतकऱ्यांना मिळत होता. बहुतेक ठिकाणी पतपुरवठा जमिनीच्या तारणावरच केला जात होता त्यामुळे शेतीमधील कुळांना कर्जपुरवठा मिळत नव्हता. ग्रामीण पतपुरवठयामधील दोष नष्ट करून त्यामध्ये सुधारणा आणणे यासाठी समितीने ग्रामीण भागासाठी परस्परनिबध्द अशा पध्दतीवर आधारीत अत्यंत महत्वपूर्ण अशा शिफारसी केल्या.

आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती (१९५१) च्या कांही महत्वपूर्ण शिफारसी:-

१) सहकारी भागभांडवलात सरकारी भागीदारी.
२) पीक-तारण कर्जपध्दती देशात सर्वत्र लागू करावी.
३) सहकारी क्षेत्रात पतपुरवठा व विक्री यांची सांगड घालावी.
४) मोठया आकाराच्या सहकारी संस्था स्थापन कराव्यात.
५) शेतमालाच्या साठवणूकीसाठी अधिकृत गुदामांची संख्या वाढवावी.
६) सहकारी प्रशिक्षणाची मोठी व्यवस्था करावी.
७) कार्यक्षम देखरेख यंत्रणा व ऑडीटची व्यवस्था करावी.
८) पतपुरवठा धोरणातील धोके टाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेने पुढील दोन दीर्घकालीन निधी स्थापन करावेत.
   अ) राष्ट्रीय शेती पतपुरवठा (स्थैर्य) निधी.
   ब) राष्ट्रीय शेती पतपुरवठा (मदत व तारण) निधी.

आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या बहुतेक शिफारसी भारत सरकारने स्वीकारल्या आणि त्यांच्या अंम्मलबजावणीचे कार्य चालू केले. शेती विकासासाठी लागणारा कर्जपुरवठा वेळेवर मिळावा

यासाठी सहकारी कर्जपुरवठयाची योग्य अशी रचना तयार करण्यात आली. परस्परनिबध्द ग्रामीण कर्जपुरवठा योजनेच्या अंमल बजावणीसाठी रिझर्व्ह बँकेला महत्वाची भूमिका पार पाडावी लागली [१३]. याबरोबरच भारतीय रिझर्व्ह बँक कायद्यामध्ये १९५५ ला सुधारणा करण्यात आली आणि त्यानुसार राष्ट्रीय शेती पतपुरवठा (दीर्घमुदती) निधी आणि राष्ट्रीय शेती पतपुरवठा (स्थैर्य) निधी या निधींची स्थापना करण्यात आली. आता प्रत्यक्षात हे दोन निधी संपूर्ण रकमेसह " राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेकडे " सोपविण्यात आले आहेत [१४]. पुढील कारणासाठी या निधींचा उपयोग केला जात असे:-

अ) सहकारी संस्थांचे भागभांडवल राज्य सरकारांनी खरेदी करावे यासाठी २० वर्षे मुदतीपर्यंतचे कर्ज राज्य सरकारांना पुरविणेसाठी.

ब) शेती आणि इतर संबंधित कार्यासाठी राज्य सहकारी बँकाकडून पुरविण्यात येणा-या मध्यममुदती कर्जासाठी त्यांना अॅडव्हान्स देता यावा, आणि,

क) मध्यवर्ती भूविकास बँकांचे कर्जरोखे खरेदी करता यावेत यासाठी २० वर्षे मुदतीपर्यंतचे कर्ज पुरविणे.

दुष्काळ, महापूर अशा नैसर्गिक आपत्तीमुळे अल्पकालीन कर्जाची परतफेड करणे अशक्य झाल्यास अशा कर्जाचे रूपांतर मध्यम मुदती कर्जात करणेसाठी पुनर्वित्तपुरवठा करण्यासाठीही या निधींचा उपयोग होतो. या विविध कार्यामुळे सहकारी पतपुरवठयाची सुयोग्य रचना करून सहकारी पतपुरवठयाचा विकास करण्यात रिझर्व्ह बँकेने महत्त्वपूर्ण भाग घेतल्याचे दिसून येते [१५].

वैकुंठभाई मेहेता समिती १९५९:

सहकारी पतपुरवठयाचा अधिक चिकित्सकविचार करण्यासाठी भारत सरकारने १९५९ मध्ये कै. वैकुंठभाई मेहता यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त केली होती. या समितीनेही शेती उत्पादनाचा वेग वाढविण्याच्यादृष्टीने सहकारी पतपुरवठयाबाबत अनेक महत्वपूर्ण शिफारसी केल्या. या समितीच्या शिफारसी मधील कांही महत्वाच्या शिफारसी पुढीलप्रमाणे:-

१) शेती सहकारी पतसंस्था अर्थक्षमतेच्या तत्वावर स्थापन कराव्यात. तीन हजार लोकसंख्यासाठी किंवा २-३ खेडयांच्या समूहासाठी अशा संस्था स्थापन कराव्यात.

२) मोठया शेतक-यांबरोबरच अल्पभूधारक आणि कुळे यांनाही शेती सहकारी पतसंस्थेचे सभासदत्व देण्यात यावे.

३) कर्जदाराची परतफेडीची क्षमता पाहून कर्जमर्यादा ठरविण्यात यावी. यासाठी शेतीपतपुरवठयाच्या गरजे बरोबर सचोटी, उत्पादकता, निष्ठा, यांचाही आधार घ्यावा.

४) रिझर्व्ह बँकेने मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कर्जमर्यादा अधिक सढळ करून द्याव्यात.

५) सरकारी तगाई कर्जे सहकारी पतरचनेमार्फतच दिली जावीत.

मेहता समितीच्या अनेक शिफारसी सरकारने स्वीकारल्या व त्यांची अंमलबजावणी केली. सहकारी पतपुरवठयाचे धोरण देशामध्ये सर्वत्र सारखे ठेवले गेले आणि सहकारी पतपुरवठा धोरणात (प्रामुख्याने ग्रामीण पातळीवर) राष्ट्रीय एकसूत्रीपणा आणण्यात आला. यामुळे योग्य व पुरेशा कर्जाचा प्रवाह देशातील सर्व विभागातील शेतक-यांचेकडे चालू करता आला[१६].

कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळ

AGRICULTURAL REFINANCE & DEVELOPMENT CORPORATION

शेती विकासासाठी दीर्घमुदती भांडवलपुरवठा आवश्यक असतो. शेतीसाठी असा दीर्घमुदती कर्जपुरवठा करणा-या संस्थाना भांडवल पुरवठा करण्याचे कार्य रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया करीत होती. परंतु १९६० चे नंतरचे काळात शेती विकासासाठी मध्यममुदती व दीर्घमुदती कर्जपुरवठा करण्याचे कार्य, रिझर्व्ह बँकेच्या कक्षेमध्ये राहून करण्यासाठी स्वतंत्र अशाप्रकारचे महामंडळ असावे अशी आवश्यकता निर्माण झाली. जुलै १९६३ मध्ये " ॲग्रीकल्चरल रिफायनान्स कार्पोरेशन " हा स्वतंत्र कायदा तयार करण्यात आला. या कायद्याखाली जुलै १९६३ मध्ये " शेती पुनर्वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

महत्वाच्या शेतीविकास योजनांसाठी भांडवलपुरवठा (मध्यम व दीर्घमुदती) करणे, शेती विकासाशी संबंधित इतर कार्ये किंवा प्रासंगिकबाबी यासाठी पुनर्वित्त मार्गाने किंवा इतर प्रकारे मध्यम व दीर्घ मुदतीचा भांडवलपुरवठा करणे, शेतीमधील खाजगी गुंतवणूकीस चालना देणे इ. हेतूनी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. कृषि पुनर्वित्त महामंडळ कायद्याच्या सेक्शन २२ खाली हे महामंडळ शेतीविकासाच्या कार्यासाठी गरजेनुसार पात्र संस्थाना आवश्यक त्या प्रमाणात भांडवलपुरवठयाची तरतूद करते[१७]. पात्र संस्था म्हणजे:-

अ) राज्य सहकारी भूविकास बँका, राज्य सहकारी बँका, अनुसूचित बँका यापैकी महामंडळाची भागधारक असणारी प्रत्येक संस्था.

ब) याशिवाय यामध्ये समाविष्ट नसणा-या सहकारी संस्था.

क) रिझर्व्ह बँकेने संमत्ती दिलेल्या संस्था.

" प्रकल्प दृष्टीकोन " साली समासद बँकाना पुनर्वित्त पुरवठयाची तरतूद करण्यासाठी एक साधन म्हणून " कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळ " अत्यंत उपयुक्त अशी संस्था होती. शेती विकास योजनांमध्ये गुंतवणूकीबरोबरच अशा योजनांची(प्रकल्पांची) तांत्रिक व आर्थिक शक्यताही महामंडळाकडून अजमाविली जाते आणि त्यानुसारही आर्थिक मदत पुरविली जाते. महामंडळाच्या पुनर्वित्त पुरवठयाचा फायदा मिळवणाऱ्या महत्वाच्या संस्थामध्ये राज्य सहकारी भूविकास बँका, राज्य सहकारी बँका, अनुसूचित व्यापारी बँका आणि विभागीय ग्रामीण बँका यांचा समावेश आहे. या सर्व बँकापेक्षा भूविकास बँकानी या महामंडळाच्या स्थापनेपासून गुंतवणूकीसाठी जास्तीत जास्त भांडवलपुरवठा महामंडळाकडून मिळविला आहे.

कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळाची[१८]
कार्ये: (कायद्यामध्ये नमूद केलेली):

१) पुनर्वित्त पुरवठयाच्या मार्गाने प्राथमिक संस्थाना शेती विकास आणि संबंधित इतर विकास कामे याना आवश्यक त्या साधनसाम्रगीची तरतूद करणे. उदा.पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कृत्रिम पैदास इत्यादि.

२) राज्य सहकारी भूविकास बँका, राज्य सहकारी बँका, अनुसूचित व्यापारी बँका, सहकारी संस्था (रिझार्व्ह बँकेने संमती दिलेल्या) यांनी विक्रीस काढलेले कर्जरोखे खरेदी करणे व मान्यता देणे.

शेती उत्पादन वाढीसाठी स्वतंत्र विकास योजनाना सहकारी भूविकास बँका, विभागीय ग्रामीण बँका, राज्य सहकारी बँका, व्यापारी बँका आणि इतर पात्र संस्था यांचेमार्फत नेहमीच्या पुनर्वित्त पुरवठा मार्गाने योजनाना दीर्घकाळ किंवा योजना लाभ मिळण्यास पात्र होईपर्यंतच्या काळामध्ये भांडवल पुरविले जाते. यामधील कांही योजना पुढीलप्रकारे:-

अ) जमिन लागवडीखाली आणणे, बांधबंदिस्ती, भूसंरक्षण, पाणीपुरवठा या प्रकारच्या जमिन सुधारणा.

ब) मळे आणि बागा विकास (रबर, चहा, कॉफी, नारळ, बदाम, वेलची, दालचिनी, अक्रोड यासारखी स्वतंत्र पिके).

क) तांत्रिक शेती विकास, विहीरी पंपसेट यासाठी विद्युत वापर.

ड) पशुपालन विकास, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादि.

इ) गोडाऊन्स, मार्केट यार्ड.

ई) शेतीमधील हवाईकला (विमान उपयोग.

फ) एकत्रित कापूस विकास योजना.

ग) जंगलविकास.

मान्यता असणा-या पात्र संस्थामार्फत वरील योजनाना महामंडळ पुनर्वित्त स्वरूपाने भांडवल उपलब्ध करून देते. राज्य भूविकास बँकांनी विक्रीस काढलेले विशेष विकास कर्जरोखे खरेदी करून तसेच राज्य सहकारी बँका व अनुसूचित व्यापारी बँकाना कर्जपुरवठा करून वरील योजनाना महामंडळ भांडवल पुरविते. तसेच रिझर्व्ह बँकेच्या संमतीने अपवादात्मक परिस्थितीत कांही सहकारी संस्थाना प्रत्यक्ष भांडवल पुरवठासुध्दा कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळ करते. विशिष्ठ प्रसंगी २५ वर्षे मुदतीची कांही कर्जही अशा संस्थाना दिली जातात. मध्यम मुदत भांडवलपुरवठा ३ ते ५ वर्षासाठी तर दीर्घमुदत कर्जे जास्तीत जास्त १५ वर्षे मुदतीची दिली जातात. महामंडळाचा व्याजदर वार्षिक ६ टक्के इतका आहे. अशात-हेने महामंडळाने मध्यम मुदत व दीर्घमुदत पुनर्वित्त पुरवठयाच्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळाच्या स्थापनेपासून राज्य सहकारी भूविकास बँकानी महामंडळाकडून आर्थिक मदत घेऊन अनेक महत्वाच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. जून १९८० पर्यंत महामंडळाने शेतीविकासाच्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१२२२५ योजना मंजूर केल्या आहेत. या योजनापैकी ३७१७ योजना प्रत्यक्ष कार्यान्वित केलेल्या आहेत [१९]. तसेच १७१५ को.रू.ची कर्जे मंजूर केली आहेत, आणि १०३० को.रू.कर्जाचे प्रत्यक्ष वाटप केलेले आहे. महामंडळाने पुरविलेल्या एकूण भांडवलामध्ये राज्य सहकारी भूविकास बँकाचा हिस्सा ५४ टक्के इतका आहे. राज्य सहकारी बँकाचा हिस्सा २ टक्के इतकाच आहे. आंतरराष्ट्रीय विकास संघटना आणि जागतिक बँक यांचेकडूनही महामंडळाने भांडवल मिळविले आहे.

पुनर्वित्त पुरवठयाचे बाबतीत महामंडळाची पध्दती वेळकाढू आहे. ५ को.रू.पेक्षा मोठया खर्चाच्या योजनानाच भू-विकास बँकामार्फत पुनर्वित्त पुरवठा मिळतो. कमी गुंतवणूकीच्या योजनाना महामंडळाकडून पुनर्वित्त पुरवठा मिळत नाही. विकास योजना राबविणाऱ्या विविध संस्थामध्ये परिणामकारक सहकार्याचा अभाव यामुळे महामंडळाच्या कार्यामध्ये कांही दोष दिसून येतात. यासाठी व महामंडळाच्या कार्यामध्ये सुधारणा व्हावी यादृष्टीने आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुन:पाहणी समितीने खालीलप्रकारच्या कांही महत्वपूर्ण सूचना केल्या आहेत:-

१) रिझर्व्ह बँकेने महामंडळाला मोठया प्रमाणात गुंतवणूकीसाठी कर्जरोख्यांच्या विक्रीमधून निधी उपलब्ध करून द्यावा.
२) महामंडळाने वसूल भांडवल ५ को.रू.करून २५ को.रू.पर्यंत वाढवावे.
३) महामंडळाने नवीन योजना स्वीकारताना राज्य व केंद्र सरकारचे पातळीवरील तज्ञांची मदत घेऊन शेती उत्पादन वाढीच्या विकास योजनांची पाहणी करावी.
४) गुंतवणूकीसाठी भांडवलपुरवठा करणाऱ्या संस्थाना महामंडळाने आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

५) महामंडळाला रिझर्व्ह बँकेकडून कमी व्याज दरात भांडवल उपलब्ध व्हावे.

६) सर्व हेतूसाठी महामंडळाने स्वत:चा तांत्रिक नोकरवर्ग ठेवावा.

७) महामंडळाने प्रत्येक राज्यामध्ये आपले कार्यालय स्थापन करावे.

८) महामंडळाने पुनर्वित्त पुरवठयामध्ये नवीन संस्थांचा समावेश करावा इत्यादि.

आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुन:पाहणी समिति १९६९:

रिझर्व्ह बँकेने १९५१ साली ग्रामीण भागातील पतपुरवठा, त्यामधील दोष आणि उपाययोजना यासाठी आखिल भारतीय पतपुरवठा पाहणी समिती नियुक्त केली होती. त्याचप्रकारे ग्रामीण पतपुरवठयाची पुन: पाहणी आणि सुधारणा यासाठी श्री.वेंकटप्पय्या यांचे अध्यक्षतेखाली ही समिति नेमली. या समितीनेही ग्रामीण पतपुरवठयामधील सुधारणेसाठी आपल्या अहवालात अनेक शिफारसी केल्या. सहकारी पतपुरवठा धोरणात बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने या शिफारसी मूलगामी आणि महत्वाच्या होत्या. या शिफारसीपैकी कांही पुढीलप्रमाणे:-

१) रिझर्व्ह बँकेमध्ये शेती पतमंडळाची स्थापना करावी.

२) लहान शेतक-यासाठी निवडक जिल्हयामधून स्मॉल फार्मस डेव्हलपमेंट एजन्सी स्थापन करावी.

३) शेती व लधुउद्योगांचा विकास साधण्याच्याहेतूने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाची स्थापना करावी.

४) शेती पुनर्वित्त महामंडळाचा आकार आणि व्याप्ती वाढविण्यात यावी.

५) व्यापारी बँकाकडे शेतीपतपुरवठयाबाबत कांही जवाबदा-या सोपवाव्यात.

ग्रामीण भागातील सहकारी संस्थापैकी अनेक संस्था अर्थक्षम, नसल्याचे समितीला आढळून आले. यासाठी १९७१ पर्यंत अर्थक्षम संस्थाच अस्तित्वात राहतील अशाप्रकारे प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांची पुर्नरचना करण्यात यावी. या पुनर्रचनेमुळे ग्रामीण उत्पन्नाचा वाढता भाग बचतीच्या रूपाने सहकारी संस्थाकडे आकृष्ठ होईल. अशी शिफारसही समितीने केले होती.

कृषिपत मंडळ:

सहकारी बँकाना रिझर्व्ह बँककडून पुरविल्या जाणा-या कर्ज सुविधांच्या प्रमाणात वाढ करणे, लघु व कुटीरोद्योगांचे बाबतीत कच्या मालाचे वितरण, उत्पादन व खरेदी विक्री इ.साठी आवश्यक असणा-या सवलती पुरविणे. सहकारी कर्जपुरवठयाचा प्रवाह सातत्यपूर्ण आणि उत्पादकतेवर आधारीत असा राहणेच्यादृष्टीने सहकारी कर्जपरवठयाची धोरणे आणि पध्दती यामध्ये बदल करणे. अशा अनेक समस्या सोडविणेसाठी प्रस्थापित व्यवस्थेमध्ये प्रमुख रचनात्मक बदल करण्याची गरज आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुर्नपाहणी समिती १९६९ ने व्यक्त केली. तसेच तज्ञ व्यक्तींच्या उच्चाधिकार मंडळाकडून ग्रामीण पतपुरवठा कार्यक्षम करणेच्यादृष्टीने बँक धोरणामध्ये पुन:पाहणी करून आधुनिकता आणणे, या हेतूने आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीने " कृषिपत मंडळ " नावाने कायद्यानुसार नवीन मंडळाची नियुक्ती करावी अशी सूचना केली होती [२०].

आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समिती १९६९ च्या वरील शिफारसीनुसार फेब्रुवारी १९७० मध्ये रिझर्व्ह बँकेने " कृषिपत मंडळ " स्थापन केले. रिझर्व्ह बँककडे असणा-या ग्रामीण व सहकारी पतपुरवठयाबाबत कायम सल्लागार समिती ची पुनर्नियुक्ती रिझर्व्ह बँकेने " कृषिपत मंडळ " म्हणून केली. तसेच या मंडळाचे चेअरमन म्हणून रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची नियुक्ती केली

आणि मंडळाच्या इतर १३ सदस्यामध्ये आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीने सुचविल्याप्रमाणे भारत सरकार, सहकारी बँका, व्यापारी बँका, शेती पतपुरवठयामधील तज्ञ इत्यादि प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला.

शेती पतपुरवठयाच्या संदर्भात धोरण ठरविताना या मंडळाकडून रिझर्व्ह बँकेला वेळोवेळी सल्ला पुरविला जातो. शेती पतपुरवठयाबाबत आखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी तसेच रिझर्व्ह बँक व इतर यानी सुचविलेले उपाय स्वीकारावेत अशा महत्वाच्या विषयाच्या संदर्भात शेतीपतमंडळाच्या १९७०-७१ मध्ये एकदा व १९७१-७२ मध्ये दोनदा बैठका झाल्या[२१]. यामध्ये शेती कर्जपुरवठयाबाबत व्यापारी बँकाना सहकारी बँकाकडून द्यावयाच्या सवलती व अधिकाराचे वितरण आणि शेती पुरवठयाबाबत सहकारी आणि व्यापारी बँका यांचेमधील सहकार्य याबाबतीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

कृषिपत मंडळाने सोयीसाठी दोन कायम समित्या नियुक्त केल्या आहेत.

१) सहकारी चळवळीच्या क्षेत्रामधील वित्तपुरवठयाच्या समस्याबाबत सल्ला पुरविणे, लघु व कुटीरोद्योग, वितरण, खरेदी विक्री कार्य यासंदर्भातील पतपुरवठयाच्या समस्या सोडविणे.

२) शेतीच्या दीर्घमुदती कर्जातील अडचणी दूर करणे.

अशा दोन स्वतंत्र समित्या कार्य करतात.

पुनर्पाहणी समितीच्या शिफारसीनुसार मध्यवर्ती सहकारी बँकाना ठेवी जमविणेसाठी आणि रिझर्व्ह बँककडूनच्या कर्ज उभारणीतील अडचणी दूर करणे यासाठी प्रोत्साहनपर मदत पुरविण्याच्या शक्यतेची पाहणी करण्यासाठी कृषिपत मंडळाने एक अभ्यास मंडळसुध्दा नेमले होते[२२]. या अभ्यास

मंडळाने रिझर्व्ह बँकेने शेती हेतूसाठी द्यावयाच्या कर्जाच्या व्याजदराचा नमुना सुचविला. त्यानुसार रिझर्व्ह बँकेने बँक दरापेक्षा अर्धा टक्का कमी व्याजदर आकारावा परंतु मध्यवर्ती सहकारी बँका खालील बाबीवर दीड टक्का रिबेट मिळविण्यास पात्र ठरतील. त्याम्हणजे मध्यवर्ती बँकेची मूळ भांडवल उभारणी व ठरविलेल्या तीन वर्षामध्ये रिझर्व्ह बँकेपासून केलेली उच्च पातळीवरील भांडवल उभारणी. याबरोबरच ठराविक वर्षामधील मध्यवर्ती बँकाची शेती कर्जाच्या साधनाव्यतिरिक्त स्वत:च्या भांडवल उभारणीतील इतर अधिक वाढ.

३० जून,१९७२ ला या शिफारसी रिझर्व्ह बँकेने विचारार्थ घेतल्या आणि १९७३-७४ पासून त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली. पुढील काळामध्ये कृषिपत मंडळाचे कार्य शेती कर्जाबरोबरच सहकारी पतपुरवठयाबाबत अत्यंत महत्वाचे असे राहीले आहे.

बहुसंस्था दृष्टीकोन:

कृषिपत मंडळाच्या स्थापनेबरोबरच अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीच्या शिफारसीनुसार सहकारी पतपुरवठयाबरोबरच बहुसंस्था दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. सर्वसाधारणपणे दुस-या व तिस-या पंचवार्षिक योजनांच्या काळात सहकारी पतपुरवठयाचे धोरण निश्चित होण्यास योग्य पार्श्वभूमि निर्माण झाली होती. शेतकर्जपुरवठयाबरोबरच इतर बाबतीतही व्यापारी बँकांनी सहकार्य करावे तसेच त्यांची मदत मिळावी यासाठी १९७० नंतरचे काळात सहकारी पतधोरणाची जागा बहुसंस्था दृष्टीकोनाने घेतली[२३].

शेतीक्षेत्रासाठी विविध रचनात्मक सेवा पुरविण्याचेदृष्टीने सहकारी पतधोरणामध्ये महत्वपूर्ण बदल करण्यात आले. हरित क्रांतीमुळे कर्जपरवठयाबरोबर कर्ज मागणीतही मोठी वाढ झाली. त्यास कारणीभूत असणारे घटक पुढीलप्रमाणे:

१) मोठया प्रमाणात उत्पादन वाढविण्यासाठी भारतीय शेतीचे आधुनिकीकरण.

२) रासायनिक खतांच्या वितरणात्मक व्यापारासाठी पतपुरवठयाच्या साधनामध्ये वाढ.

३) खरेदी-विक्री आणि साठवणूक यासाठी वाढलेली पतपुरवठयाची मागणी (प्रामुख्याने जास्त उत्पादन देणा-या पीक कर्ज योजनेनंतरचे काळात).

वरील घटकानुसार वाढणाऱ्या कर्जाच्या गरजा केवळ सहकार क्षेत्राकडून पूर्ण होणार नाहीत या जाणिवेतूनच शेती व ग्रामीण क्षेत्रातील पतपुरवठयासाठी बहुसंस्था तत्वाचा स्वीकार करण्यात आला आहे[२४]. या योजनेखाली ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील मोठया प्रमाणातील कर्जमागणीतील तूट कमी करणे हा रिझर्व्ह बँकेचा मुख्य हेतू होता. तसेच या कर्जविषयक गरजा भागविता याव्यात यासाठी १९७२ च्या बँकिंग आयोगाच्या शिफारसीनुसार विभागीय ग्रामीण बँकासारख्या स्वतंत्र संस्था १९७५ पासून निर्माण करण्यात आल्या.शेती आणि इतर कार्यासाठी आवश्यक तो कर्जपुरवठा करण्याबाबत सहकारी चळवळ महत्वाची भूमिका पार पाडू लागली. देशामधील कोटयावधी लहान व विखुरलेल्या शेतक-यांना एकत्र करून त्याना विकासाच्या मार्गावर आणण्याचे कार्य करणे सहकारी चळवळीस यामुळे शक्य झाले आहे[२५].

राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक:

रिझर्व्ह बँकेने १९७९ मध्ये श्री.शिवरामन यांचे अध्यक्षतेखाली शेती व ग्रामीण विकासातील संस्थात्मक पतपुरवठयाच्या व्यवस्थेची पुनर्पाहणी करण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. ही समिती " कमिटी फॅार

रिव्हाइव्हींग अरेंजमेंटस् फॉर फायनान्सींग इन्स्टीटयुशनल क्रेडिट फॉर ॲग्रीकल्चर ॲन्ड रूरल डेव्हलपमेंट" (CRAFICARD) या नावाने ओळखली जाते[२६]. या समितीने शेती व ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थेबाबतचा आपला अहवाल मार्च १९८१ मध्ये सादर केला. अहवालामध्ये समितीने शेतीपतपुरवठयामधील समस्या, सहकारी पतपुरवठयाची रचना, याबाबतही महत्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत. तसेच समितीने नमूद केले आहेत की " शेतीपतपुरवठयाच्या समस्या या फक्त गुंतागुंत आणि आकार वाढविणा-याच आहेत असे नव्हे तर त्यामध्ये ग्रामीण विकासातील एका मोठया कार्याचा समावेश आहे.

नाबार्डची स्थापना:

शेती व ग्रामीण विकासातील संस्थात्मक पतपुरवठा व्यवस्थेच्या पुनर्पाहणी समितीने एकत्रित ग्रामीण विकासासाठी कर्ज उभारणीमध्ये अविभाज्या लक्ष्यपुरवठा, सामर्थ्यशील मार्गदर्शन आणि जोरदार लक्ष केंद्रीत करणे यासाठी नवीन संघटनात्मक कल्पनेची गरज आहे असे सुचविले. याच उद्देशाने समितीने राष्ट्रीय पातळीवर नवीन बँक " राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँका " (नाबार्ड) स्थापन करण्याचे सुचविले. समितीच्या मते शेतीक्षेत्रातील ही सर्वोच्च बँक असेल. समितीची ही सूचना सरकारने स्वीकारली. जुलै १९८२ मध्ये पार्लमेंटने " राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेचा कायदा करुन त्यानुसार १२ जुलै,१९८२ ला" राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेची " (नाबार्ड) स्थापना केली[२७]. शेती पुनर्वित्त बँका व विभागीय बँकाशी संबंधित असलेली रिझर्व्ह बँकेची पुनर्वितपुरवठयाची कार्ये या बँकेकडे सोपविण्यात आली.

राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेच्या चेअरमनपदी रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर असतात. तसेच मध्यवर्ती संचालक मंडळावर भारत सरकारचे तीन प्रतिनिधी असतात. या बँकेचे $\frac{1}{2}$ भागभांडवल रिझर्व्ह बँकेचे आहे त्यामुळे ती रिझर्व्ह बँकेशी सलग्न संस्था आहे. बाकीच्या $\frac{1}{2}$ भागभांडवलात भारत सरकारने सहभाग घेतला आहे. नाबार्डने अधिकृत भागभांडवल ५०० को.रू.चे आहे. आणि वसूल भागभांडवल १०० को.रू.चे आहे. कर्जू परवठा व मागणी लक्षात गरज भासल्यास भारत सरकारकडून निधी मिळविला जातो तसेच जागतिक बँक व इतर संस्था यांचेकडूनही आर्थिक मदत मिळविली जाते. राष्ट्रीय शेती पतपुरवठा (दीर्घमुदती व्यवहार व स्थिरीकरण) निधी रिझर्व्ह बँकेकडून राष्ट्रीय शेती व विकास बँकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. तसेच अल्पमुदत पतपुरवठा व खेळते भांडवल यासाठी ही बँक सर्वस्वी रिझर्व्ह बँकेवर अवलंबून असते.

नाबार्डची कांही महत्वाची कार्ये[२८] :

१) एकात्मिक ग्रामीण विकासासाठी शेती, लघुउद्योग, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तोद्योग, कारागिर व्यवसाय आणि इतर आर्थिक कार्ये असे सर्व प्रकारचे उत्पादन आणि गुंतवणूक यासाठी अनेक मार्गांनी वित्तपुरवठा करणे.

२) राज्य सहकारी बँका, विभागीय ग्रामीण बँका, भूविकास बँका आणि रिझर्व्ह बँकेने संमती दिलेल्या इतर वित्तीय संस्था यांना अल्पमुदत, मध्यममुदत आणि दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करणे.

३) राज्य सरकारांना सहकारी संस्थांचे भाग भांडवल खरेदी करता यावे यासाठी दीर्घमुदती (२० वर्षे मुदतीचा) कर्जपुरवठा करणे.

४) केंद्र सरकारने संमती दिलेल्या किंवा भाग भांडवलामध्ये सहभागी असलेल्या किंवा गुंतवणूकीसंबंधी तारण देणाऱ्या कोणत्याही संस्थेला शेती आणि ग्रामीण विकासासाठी दीर्घमुदतीची कर्जे पुरविणे.

५) विभागीय ग्रामीण बँका, सहकारी बँका, यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारी.

६) शेती आणि ग्रामीण विकासामध्ये संशोधन वाढविणेसाठी " संशोधन व विकास निधी " चालविणे.

सहकारी–पत पुरवठयात सहभाग:

कृषि पुनर्वित व विकास महामंडळाची कार्ये आणि रिझर्व्ह बँकेच्या ग्रामीण कर्ज योजनांची संपूर्ण जबाबदारी राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेकडे आहे. यामुळे सहकारी पतपुरवठयाला प्रचंड प्रेरणा या बँकेकडून मिळाली आहे आणि शेती व ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे.

जून १९८४–८५ ला बँकेची एकूण साधनसामुग्री ५४१ को.रू.इतकी होती. याच काळात हंगामी शेती कार्यक्रिया कर्जपुरवठयासाठी राज्य सहकारी बँकाना एकूण १२३३ को.रू. इतके अल्पमुदती भांडवल पुरविले गेले आणि मध्यम मुदती कर्ज एकूण ३८ को.रू.चे दिले गेले. विशेष म्हणजे हे सर्व कर्ज बँक दरापेक्षा ३ टक्के कमी व्याजदराने दिले जाते. राष्ट्रीय शेती आणि विकास बँकेच्या धोरणातील हा महत्वपूर्ण बदल होय. १९८४–८५ मध्ये पुनर्वित पुरवठयाच्या मार्गाने १२३३ विविध योजनाना १०६१ को.रू.इतका कर्जपुरवठा केला गेला. यामध्ये राज्य सहकारी भूविकास बँकांचा हिस्सा ३१४ को.रू.आहे तर राज्य सहकारी बँकांचा हिस्सा ३७ को.रू.इतका आहे[२९].

: पीक कर्ज योजना - एक टिपण :

शेतीच्या हंगामी कामाना प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थाकडून पुरविल्या जाणा-या कर्जासाठी एक धोरणात्मक उपाय म्हणून भारतामध्ये पीक कर्ज योजना स्वीकारली गेली आहे. या योजनेचा उगम डॉ.डी.आर. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली १९४४ ला भारत सरकारने नेमलेल्या शेती पतपुरवठा उपसमितीच्या शिफारसीमध्ये दिसून येतो. याचबरोबरच सहकार नियोजन समिती १९४५ आणि अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती (गोरवाला समिती) १९५४ यांनीही याबाबत महत्वपूर्ण अशी शिफारस केली होती. पीक कर्ज पध्दतीत शेतक-याला पीक घेण्याकरिता व मशागतीसाठी कर्ज दिले जाते म्हणजे कर्जाच्या व शेतीतील उत्पादनाचा प्रत्यक्ष संबंध जोडला जातो. पीक कर्ज पध्दतीत शेतक-याला विशिष्ट प्रकारचे पीक घेण्याकरिता किंवा पीक लागवड करण्याकरिता कर्ज दिले जाते. यामध्ये कर्जाची रक्कम, घेतले जाणारे पीक, त्याचे क्षेत्र, प्रकार व त्याला येणारा खर्च विचारात घेऊन ठरविली जाते. ही पध्दत मुख्यत: पीक उत्पादनक्षमता आणि पिकांच्या विक्रीमधून मिळणारी रक्कम या घटकावर आधारित आहे. पीक कर्जाची रक्कम रोख आणि वस्तूंच्या स्वरूपात दिली जाते. रिझर्व्ह बँकेनेही पीक कर्ज योजना स्वीकारली जावी अशी सूचना राज्य सरकाराना केलेली होती.

दुस-या पंचवार्षिक योजनेमधील सहकारी विकास कार्यक्रमामधील पीक कर्ज योजना हे एक मुळ वैशिष्ठ्य होते. परंतु १९६५-६६ पर्यंत या योजनेची प्रगती मंद गतीने होत होती. सुधारित जातीची बियाणे, पीक पध्दती, आधुनिकीकरण व उत्पादनवाढ यामध्ये या योजनेचा वापर केला जाऊ लागला. अधिक उत्पादन, बियाणे यासारख्या कार्यक्रमासाठी गरजेनुसार

विविध राज्यानी एक महत्वपूर्ण उपाय म्हणून पीक कर्ज योजनेची अंमलबजावणी केलेली आहे.

पीक कर्ज योजनेची वैशिष्ठये:

पीक कर्ज योजनेची मुख्य वैशिष्ठये खालीलप्रमाणे:-

१) पीक कर्जाचा उद्देश मुख्यत: शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे हा आहे.

२) पीक कर्ज योजनेत संभाव्य पिकांच्या तारणावर कर्ज दिले जाते.

३) या योजनेत पीक उत्पादनाला जेवढा खर्च येतो त्या खर्चाच्या प्रमाणात कर्जाची रक्कम दिली जाते.

४) पिकाच्या विक्रीतून परस्पर कर्जफेड करून घेतली जाते.

५) कर्जाच्या रकमेचा कांही भाग रोख स्वरूपात आणि कांही भाग वस्तूंच्या स्वरूपात दिला जातो. उदा. सुधारित बी-बियाणे, खते, किटक नाशके इत्यादि.

पीक कर्जाचे घटक:

शेतक-यांना आवश्यक असणा-या पीक कर्ज रकमेचा अंदाज (प्रत्येक पिकांनुसार) करणेकरिता रिझर्व्ह बँकेने पुढील चार घटक सुचविले आहेत.

घटक - अ :

परंपरागत पध्दतीने शेतीची कामे करण्याकरिता येणारा खर्च. यामध्ये खतासाठीचा खर्च सर्वात कमी असतो. या पध्दतीप्रमाणे येणा-या खर्चाच्या $\frac{1}{3}$ रक्कम सभासदाला कर्जरूपाने दिली जाते.

घटक - ब:

शेतीसाठी पिकांसाठी आवश्यक असणारे बी-बियाणे, रासायनिक व इतर खते, किटकनाशके इत्यादि बाबीवरील खर्च असा खर्च शक्यतो वस्तू स्वरूपात दिला जातो.

घटक - क :

खते, किटक नाशके यांचा वापर करणेकरिता येणारा खर्च (हा खर्च वस्तू किंमतीच्या ५० टक्के पेक्षा जास्त असू नये).

घटक - ड :

जर सभासद शेतक-यांनी आपल्या शेतमालाची विक्री सहकारी खरेदी विक्री संस्थेमार्फत केली तर त्याना जादा कांही रक्कम रोख स्वरूपात दिली जावी.

१९६९ च्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीने अशी शिफारस केली होती की, सहकारी पतसंस्थानी अल्पमुदती (पीक कर्ज) कर्जपुरवठा करीत असता घटक " अ " रोख व घटक " ब " वस्तूरूप कर्ज हे फक्त दोनच घटक विचारात घेतले जावेत. यामुळे सहकारी पतसंस्थासह इतर बँकानीही अशा दोन घटकासह पीक कर्ज योजना मोठया प्रमाणात स्वीकारलेली दिसून येते. पीक कर्ज योजनेमध्ये परिस्थितीनुसार पुढील दोन मार्गानी बदल केले जातात [३१].

१) पीकाची मालमत्ता हेच खरे तारण मानले जाते. यामुळे कुळानासुध्दा कर्जपुरवठा उपलब्ध होऊ शकेल.

२) उत्पादक हेतूवर भर देऊन धंदाच्या गरजेनुसार कर्जाची रक्कम ठरवावी.

पीक कर्ज योजनेखाली वित्तपुरवठयाच्या एकत्रित योजनेनुसार शेतक-यांना पुरविल्या जाणा-या कर्जाचा ओघ वाढला आहे आणि ग्रामीण सहकारी पतसंस्थांची ताकद वाढून त्यायोगे शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे[३२].

: पीक कर्ज योजना राबविण्याची पध्दती :

कर्जाचे अंदाजपत्रक:

सहकारी संस्थेला कायद्यानुसार ३० सप्टेंबरपूर्वी सर्वसाधारण सभा घ्यावी लागते. या सभेत पुढील कामाचा अंदाज घेतला जातो. त्यामध्ये मुख्यत: पीक कर्ज योजनेखाली किती कर्ज द्यावयाचे हे ठरविले जाते. या सभेपूर्वी प्रत्येक सभासदाने आपल्या चालू वर्षाच्या कर्जाची गरज, जमीन, कोणते पीक हे संस्थेस कळवावे लागते. पूर्वीच्या माहितीच्या सहाय्याने पीक कर्ज रकमेचा अंदाज केला जातो. तसेच जिल्हा शेती अधिकारीही विविध पिकांसाठी सरासरी प्रति एकरी खर्चाची अंदाजे रक्कम जिल्हा मध्यवर्ती बँकेला कळवतो. अशा आकडेवारीचाही उपयोग होतो यावरून कर्जाचे अंदाजपत्रक तयार केले जाते.

जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांचे प्रतिनिधी, मध्यवर्ती बँक, सहकार खाते, शेती खाते व सहकारी कार्यकर्ते यांच्या वार्षिक परिषदेत शेती अधिका-याने दिलेल्या खर्चाच्या अंदाजाचा विचार केला जातो व त्यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने मध्यवर्ती बँक कर्जधोरण ठरविते.

पीक कर्ज पध्दती:

सभासदाला पिकाच्या तारणावरच कर्ज दिले जाते परंतु प्रत्येक सभासदाचा सहकारी कायद्याप्रमाणे करार लिहून घेतला जातो. त्यामध्ये

सभासदाची जमीन, क्षेत्रफळ, ठिकाण, आकार किंमत, इतरांचा बोजा इत्यादि तपशील असतो. यास इकरार म्हणतात यामुळे सहकारी संस्थेचा अशा जमीनीवर हक्क निर्माण होतो म्हणजे इकरारात नमूद जमीन जोपर्यंत संस्थेचे कर्ज, व्याज असेपर्यंत विकता किंवा इतर बोजा निर्माण करता येत नाही.

या करारानंतरच सभासदास पीक कर्ज मिळते. यामध्ये करार असला तरीही खरे तारण जमीनीवरील पीक हेच मानले जाते.

कमाल मर्यादा पत्रक:

पीक कर्ज योजनेखाली शेतक-यांना संपूर्ण वर्षात लागणा-या कर्जाचा तपशील सहकारी संस्थेला हंगामापूर्वीच जमा करावा लागतो. अशी माहिती ज्या पत्रकात जमा केली जाते त्यास कमाल मर्यादा पत्रक (क.म.पत्रक) असे म्हणतात. या पत्रकात सभासदाचे नाव, गेल्या हंगामातील पीक, त्यासाठीचे कर्ज, परतफेड, थकबाकी, पुढील हंगामात घेतले जाणारे पीक, आवश्यक कर्ज इत्यादि माहिती असते. सर्व सभासदांचे एकत्रित कमाल मर्यादा पत्रक तयार केले जाते. संस्था हे पत्रक देखरेख मंडळाकडे व त्यांचे तपासणीनंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे पाठविते. नंतर चौकशी, छाननी करून अंतिम मंजूरीकरिता बँकेच्या संचालक मंडळापुढे येते. कर्जधारणाप्रमाणे विविध पिकांसाठीचे कर्ज मंजूर केले जाते. कमाल मर्यादा पत्रकाव्दारे शेतक-यांची कर्जाची गरज समजते आणि कर्ज रक्कम कोणत्या स्वरूपात (रोख व माल) किती दिली जाणार आहे हे समजते.

कर्जवाटप पध्दती:

सभासद शेतक-यांना दिले जाणारे कर्ज तीन भागात दिले जाते. जमिनीच्या पेरणी-लागवडीपूर्व मशागतीसाठी पीक कर्जाचा पहिला भाग रोख स्वरूपात दिला जातो. दुसरा भाग बियाणे, रासायनिक खते अशा

वास्तू स्वरूपात दिला जातो. आणि कांही काळाने खतांचा वापर, पिकांची निगा इत्यादि कार्यासाठी तिसरा भाग रोख स्वरूपात दिला जातो.

कर्जवसुली :

पीक कर्जाची परतफेड शेती उत्पादनातूनच केली जावी यासाठी सभासदाने उत्पादित शेतमालाची विक्री सहकारी खरेदी विक्री किंवा सहकारी प्रक्रीया संस्थानीच करावी असे सुचविले जाते. यामुळे कर्जाची परतफेड परस्पर करून राहिलेली रक्कम सभासदांना दिली जाते.

अनेक क्षेत्रीय अभ्यास मंडळानी दाखवून दिले आहे की सहकारी संस्थांनी स्वीकारलेली प्रतिएकर कर्जाची रक्कम प्रमाण अत्यंत अपुरे आहे आणि त्यातील घटकांचे प्रमाण योग्य नाही. तसेच पिकाच्या खर्चाची रचना किंवा पीक उत्पादनाची किंमत यांच्याशीही ही कर्जाची रक्कम संबंधित नाही [३३]. अशात-हेने ठरविलेल्या कर्जमर्यादेमध्ये सुचविलेल्या पध्दतीप्रमाणे कर्जाचे दर सहकारी संस्थानी स्वीकारलेले नाहीत. सर्वसाधारणपणे सहकारी संस्थाना भांडवली साधने अपुरी असल्यामुळे उपलब्धतेप्रमाणे कर्जाचा पुरवठा करावा लागतो [३४].

-o-o-

: संदर्भ :

१) गो.स.कामत, ' सहकार:तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, १९७९ ', श्री विद्या प्रकाशन, पुणे, पान क्रमांक ३२१.

२) बी.एस.माथूर, ' को-ऑपरेशन इंन इंडिया ', १९७७, साहित्य भवन, आग्रा, पान क्रमांक ६५-६६.

३) बी.एन.चौबे, ' प्रिन्सीपल्स ॲन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेटिव्ह बँकींग इन इंडिया ', १९६८ आशीया पब्लीशिंग हाऊस, मुंबई, पान क्रमांक २४.

४) बी.एस.माथूर, उपरोक्त, पान क्रमांक ६६-६७.

५) गो.स.कामत, उपरोक्त, पान क्रमांक १२७.

६) सी.बी.मेमोरीया, ' रूरल क्रेडिट इन इंडिया ', १९८२, किताब महल, अलाहाबाद, पान क्रमांक ५५-५६.

७) सी.बी.मेमोरीया, ' ॲग्रीकल्चरल प्राब्लेम्स ऑफ इंडिया ', १९८४ किताब महल, अलाहाबाद, पान क्रमांक ४९५-९६.

८) गो.स.कामत, उपरोक्त, पान नं.१३१.

९) रूदार दत्त, के.पी.एम.सुंदरम, ' इंडियन इकॉनॉमी ', १९८३, एस. चांद आणि कंपनी,लि.,नवी दिल्ली, पान क्रमांक ४५९-६०.

१०) व्ही.टी.चौगुले, के.जी.पठार, ' सहकाराची मुलत्तवे भाग-२, भारतीय सहकारी चळवळ, १९८०, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्रमांक ४४.

११) सी.बी.मेमोरीया, उपरोक्त, पान क्रमांक ४५६-५७.

१२) गो.स,कामत, उपरोक्त, पान क्रमांक १६९.

१३) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, " रोल ऑफ दी आर.बी.आय.इन दी स्फेअर ऑफ रुरल क्रेटिड ", १९८०, आर.बी.आय.मुंबई, पान क्रमांक ५.

१४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, " रिपोर्ट ऑन करन्सी अँन्ड फायनान्स ", १९८१-८२, आर.बी.आय.,मुंबई, पान क्रमांक १९८-१९९.

१५) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, उपरोक्त, पान क्रमांक ६.

१६) डब्ल्यू.सी.श्रीश्रीमाल, " को-ऑपरेटीव्ह क्रेडिट इन प्लॅनींग इरा प्रोग्रेस, प्राब्लेम्स अँन्ड इम्पॅक्ट ", चिंचणकर आणि नाम्जोशी संपादीत " को-ऑपरेशन अँन्ड दी डायनॉमिक्स ऑफ चेंज ", १९७७, या पुस्तकातून, सोम्मय्या पब्लीशिंग प्रा.लि.,मुंबई, पान क्रमांक १८५.

१७) मनुभाई शाह, " दि न्यू रोल ऑफ रिझर्व्ह बँक इन इंडियाज् इकॉनॉमिक्स डेव्हलपमेंट ", १९७०, व्होरा अँन्ड कंपनी पब्लीशर्स प्रा.लि.,मुंबई, पान क्रमांक ८३.

१८) सी.बी.मेमोरिया, उपरोक्त पान क्रमांक ४७३.

१९) सी.बी.मेमोरिया, उपरोक्त, पान क्रमांक ८२.

२०) बी.एस.माथूर, उपरोक्त, पान क्रमांक ५६७.

२१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, " रिव्हयू ऑफ दी को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन इंडिया", १९७०-७२, १९७५, आर.बी.आय. मुंबई,पान क्रमांक १८.

२२) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, उपरोक्त, पान क्रमांक १८.

२३) डब्ल्यू.सी.श्रीश्रीमाळ, मागीलप्रमाणेच चिंचणकर नाम्जोशी संपादित पुस्तकातून, पान क्रमांक १८६.

२४) विजय कुलकर्णी, " ग्रामीण बँका लेख , योजना १६-३१ जुलै,१९८५, पान क्रमांक ७.

२५) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, "रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अॅन्ड प्रोग्रेस ऑफ बँकींग इन इंडिया ", १९७७-७८, आर.बी.आय.मुंबई, पान क्रमांक ३८-३९.

२६) सी.बी.मेमोरीया, उपरोक्त, पान क्रमांक ९७.

२७) रूदार दत्त, के.पी.एम.सुंदरम, उपरोक्त पान क्रमांक ४४७.

२८) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिा, " रिपार्ट ऑन करन्सी अॅन्ड फायनान्स" १९८१-८२, आर.बी.आय., मुंबई, पान क्रमांक १९८-१९९.

२९) आर.बी.आय." रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अॅन्ड प्रोगेस ऑफ बँकींग इन इंडिया, १९८४-८५, सप्लीमेंट आर.बी.आय. बुलेटीन, सप्टेंबर १९८५, पान क्रमांक १६१,१६३ व १६४.

३०) सी.बी.मेमोरिया, उपरोक्त, पान क्रमांक ४८४.

३१) गोखले इन्स्टिटयूट स्टडीज नं.६४, रायटींग अॅन्ड स्पीचेस ऑफ प्रोफेसर डी.आर.गाडगीळ, ऑन को-ऑपरेशन, १९७५, ओरीएन्ट लॉगमन लि.,मुंबई, पान क्रमांक १०५.

३२) सी.के.दलया, अॅन्ड आर.एस.सबनीस, " को-ऑपरेशन इन महाराष्ट्रा ", १९७३, सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंजीस, मुंबई, पान क्रमांक १५..

३३) व्ही.वेंकटेश्वरलू व मालेराव, " व्हॅलीडेटींग स्केल अॅन्ड कांपोनंटस् ऑफ को-ऑपरेटीव्ह शार्ट टर्म क्रेडिट थ्रु वल्कलाईन कॉस्ट कन्सेप्ट : इंडियन को-ऑपरेटिव्ह रीव्ह्यू, जुलै १९८४, पान क्रमांक ३.

३४) इंडियन को-ऑपरेटिव्ह रीव्ह्यू, जाने.१९८४, पान क्रमांक २४२.

-0-0-0-0-

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

6534